drppl Dharavi Redevelopment Project

# DHARAVI COMPILED MEDIA REPORT
## 29 Jan, 2025 - 30 Jan, 2025

### Total Mention 65

| Print | Financial | Mainline | Regional | Periodical |
|---|---|---|---|---|
| 10 | N/A | 2 | 8 | N/A |

| Tv | Business | English | Hindi | Regional |
|---|---|---|---|---|
| 27 | N/A | N/A | 2 | 25 |

| Online |
|---|
| 28 |

## Print

| No | Newspaper | Headline | Edition | Pg |
|---|---|---|---|---|
| 1. | The Times of India | May take over 10 yrs to spruce up Deonar dump for Dharavi redevpt, say officials | Mumbai | 2 |
| 2. | Hindustan Times | Deonar waste will take 14 yrs to clear: BMC | Mumbai | 1, 5 |
| 3. | Saamana | Adani will take 114 acres of land of Mulund | Mumbai | 2 |
| 4. | Saamana | Plot to impose 'Adani tax' on Mumbaikars | Mumbai | 1, 3 |
| 5. | Loksatta | Deonar garbage plot also to Dharavikars | Mumbai | 1, 10 |
| 6. | Loksatta | All the land in Mumbai from the government to 'Adani | Mumbai | 4 |
| 7. | Pudhari | Two and a half thousand crores to the municipality for Adani | Mumbai | 1, 2 |
| 8. | Pudhari | Adani tax will be imposed on Mumbaikars: Aditya Thackeray | Mumbai | 2 |
| 9. | Pudhari | Shiv Sena's agitation today to protest against rehabilitation | Mumbai | 8 |
| 10. | Aaple Mahanagar | Adani tax will be imposed on Mumbaikars | Mumbai | 1, 2 |

The Times of India • 30 Jan • Dharavi

## May take over 10 yrs to spruce up Deonar dump for Dharavi redevpt, say officials

| 2 • PG | 218 • Sqcm | 1230855 • AVE | 3.52M • Cir | Top Right |
|---|---|---|---|---|

Mumbai

# May take over 10 yrs to spruce up Deonar dump for Dharavi redevpt, say officials

Richa.Pinto@timesofindia.com

**Mumbai:** It could take more than a decade to clear garbage from the Deonar landfill to make way for the Dharavi redevelopment project, officials have estimated. The state govt recently directed BMC to clear solid waste from the Deonar landfill so that the Dharavi project takes off.

The 10-year estimate has been calculated on the basis of similar clearance work done at the now-defunct Mulund landfill. Civic data shows that despite using bio-mining, it has taken a BMC-appointed contractor seven years to clear just 60% of the legacy waste so far. For this, BMC is spending Rs 600 crore.

According to the contract clause, the Mulund landfill is estimated to have approximately 7 million tons of legacy waste, of which 3.73 million tons has been cleared so far.

### TALE OF 2 GARBAGE DUMPS

**Biomining at Mulund:** Ongoing
**Quantum of waste** | 7 million tons
**Time taken** | since 7 years, 60% cleared so far
Cost ₹600cr
**Operating period** | 1968-2018

**At Deonar**
**Quantum of waste** | 20 million tons
**Estimated time** 10 years
Cost ₹2,500cr
Operating since | 1927



By this calculation, considering that Deonar landfill is much older with 20 million metric tons of legacy waste, there is a larger volume piled up there. "So, it could easily take more than a decade to clear this," an official said.

Deonar dumping ground became operational in 1927, while the Mulund dump became operational in 1967.

A BMC official said that the civic body will have to look at scientifically processing waste at Deonar, which is a long-drawn process. In the case of the Mulund landfill, the Covid-induced lockdown impacted scientific closure work as there was no manpower and machinery was available. "The six-year deadline set to clear the entire dump could not be met," the official said.

In Jun 2018, BMC tabled a proposal before the standing committee to shut the Mulund dump. The 24-hectare Mulund dumping ground was operating since 1968.

Activists have opposed the state govt's directive to BMC. Activist and advocate Godfrey Pimenta alleged that the state is prioritising a private developer's interests over scientific landfill closure, which it failed to mandate for years.

Last week, the state govt came back to BMC to take responsibility to clear waste at Deonar dumping ground, which was handed over to them for the Dharavi Redevelopment Project. In a letter to the civic chief on Jan 24, the state, referring to the Swachh Bharat Mission Rules 2016, stated that guidelines state that it is the municipality's duty to clear the land by scientifically treating waste.

Hindustan Times • 30 Jan • Dharavi

# Deonar waste will take 14 yrs to clear: BMC

| 1, 5 • PG | 269 • Sqcm | 807171 • AVE | 1.1M • Cir | Bottom Left,Middle Left |
|---|---|---|---|---|

Mumbai

## DEONAR WASTE WILL TAKE 14 YRS TO CLEAR: BMC

**Yogesh Naik**

yogesh.naik@hindustantimes.com

**MUMBAI:** After the Maharashtra government's demand that the BMC carry out biomining of the solid waste in the Deonar dumping yard and hand over the freed plot to rehabilitate Dharavi residents, the BMC's head honchos held a meeting on Tuesday and Wednesday to discuss the issue. They arrived at the conclusion that the biomining would cost them ₹2,500 crore, besides which it would take at least 12 to 14 years to complete.

→P5

{ DHARAVI REDEVELOPMENT PROJECT } DUMPING YARD LAND TO BE USED FOR REHOUSING

# Deonar waste will take 14 years to clear, cost ₹2,500 crore, says BMC

Yogesh Naik
yogesh.naik@hindustantimes.com

**MUMBAI:** After the Maharashtra government's demand that the BMC carry out biomining of the solid waste in the Deonar dumping yard and hand over the freed plot to rehabilitate Dharavi residents, the BMC's head honchos held a meeting on Tuesday and Wednesday to discuss the issue. They arrived at the conclusion that the biomining would cost them Rs 2,500 crore, besides which it would take at least 12 to 14 years to complete.

Officers from the BMC's solid waste management (SWM) department also told municipal commissioner Bhushan Gagrani that it was not possible to carry out the biomining, as there was no space in the city to dump the byproducts generated from it. Biomining of solid waste is a process that involves the excavation, treatment and separation of the waste for reuse.

"The Mulund dumping yard is much smaller in size, and we have been biomining waste there for the last six years, but have still not completed the exercise," said a key officer of the SWM department. "It will take us at least 12 to 14 years to biomine the Deonar garbage. The cost is enormous. Besides, Dharavi residents have already objected to being shifted to land reclaimed from a dumping yard."



The height of the waste at the dumping ground is 40 metres, equivalent to a 13-storey building. HT PHOTO

Last October, the state cabinet decided to give 125 acres of land from the Deonar dumping ground for rental housing for those declared ineligible for free housing in the Dharavi Redevelopment Project (DRP). This was apart from 255 acres of salt pan lands at Kanjurmarg and Mulund, 140 acres of land at Madh island and 21.25 acres of Kurla Dairy land for the rental housing project.

On January 24, Ashok Hazare, a section officer of the state revenue department wrote to Gagrani that the Deonar land had to be given back to the state free of garbage.

Prior to this, Satish Bagal, the resident deputy collector of suburban Mumbai, had written to the revenue department to get the plot cleared before the Dharavi housing allotment was undertaken.

Dharavi residents who have ground-floor shanties and have constructed houses prior to January 1, 2000 are eligible for housing inside Dharavi while those who have settled there later than the cut-off date will be given houses in the rental housing scheme at a cost of Rs 2.5 lakh per tenement.

After facing strong opposition from residents and BJP leaders in Mulund, Kurla, Dahisar and Bhakti Park, which were initially marked for the rehabilitation, the state housing department turned to the Deonar dumping yard plot where the BMC has stopped dumping solid waste. The plot belongs to the suburban collectorate and is owned by the revenue department of the state government. It is in the BMC's possession.

The state government has been corresponding with Gagrani to hand over the 326-acre plot for DRP rental housing. The BMC will retain 75 acres for various activities, including generation of electricity from waste.

A senior officer of the SWM department said that at Rs 1,200 per tonne, it would cost the BMC Rs 2,500 crore to bio-mine Deonar's 20 lakh tonnes of waste. "If the BMC spends such a large amount, it will majorly dent its finances, as it is already spending huge sums of money on the coastal road and the Goregaon-Mulund tunnel," he said.

The Deonar dumping yard site has been in use since 1927. The height of the waste there is 40 metres or equivalent to a 13-storey building. To convert the waste, the BMC has also undertaken a waste-to-electricity project at Deonar.

When contacted by HT, BMC officers refused to comment. SVR Srinivas, officer on special duty in Dharavi, said that he had yet to see the letters written by the government.

Saamana • 30 Jan • Dharavi

## Adani will take 114 acres of land of Mulund

| 2 • PG | 707 • Sqcm | 419715 • AVE | 910K • Cir | Middle Left |
|---|---|---|---|---|

Mumbai

# मुलुंडकरांची ११४ एकर जागा अदानी घेणार

## रहिवाशांचा जनआंदोलनातून संघर्षाचा इशारा

मुंबई, दि. २९ (प्रतिनिधी) – धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी केंद्र आणि राज्यातील भाजप सरकार धारावीच्या ५५० एकर जागेसह मुंबईतील मोक्याचे सुमारे दोन हजार एकरचे २० भूखंडही अदानी समूहाला देणार आहेत. त्यात मुलुंडमधील केंद्राच्या ताब्यातील मिठागरांची ५८ एकरची जागा ३१९ कोटी रुपयांच्या कवडीमोल दराने अदानीला दिली असताना आता मुंबई महापालिकेच्या मालकीची मुलुंड डंपिंग ग्राऊंडची ४६ एकर आणि जकात नाक्याची १८ एकरपैकी १० एकर अशी एकूण ११४ एकर जागा अदानी समूहाला देण्यात येणार आहे. सरकारच्या या निर्णयाविरोधात जनआंदोलनातून संघर्ष करण्याचा इशारा मुलुंडकरांनी दिला आहे.

धारावीकरांची एकूण लोकसंख्या सुमारे १२ लाख आहे. यापैकी चार लाख धारावीकरांचे धारावी पुनर्विकास प्रकल्पांतर्गत मुलुंडमध्ये पुनर्वसन केले जाणार आहे. धारावीतील पात्र आणि अपात्र झोपडीधारकांसाठी कायम आणि भाडेतत्त्वावरील अशा दोन्ही प्रकारची घरे बांधण्यात येणार आहेत. बांधण्यात येणाऱ्या घरांमुळे मुलुंडकरांच्या पायाभूत सुविधांवर प्रचंड ताण येणार आहे. एवढ्या मोठ्या लोकसंख्येचे एकाच वेळी स्थलांतर घडवून आणणे धोकादायक आहे, अशी भूमिका घेत मुलुंडकरांनी धारावीकरांच्या मुलुंडमधील पुनर्वसनाला विरोध केला आहे.

### 'नव्या धारावी'ला विरोध

- मुलुंडकरांनी नव्या धारावीला जोरदार विरोध केला आहे. 'मुलुंड नाही तर नवी धारावी,' असे उपहासात्मक टोला मारणारे शेकडो फलक मुलुंडमध्ये झळकले होते. मात्र हे फलक पोलिसांनी हटवले आहेत.
- मुलुंडमध्ये आधीच खूप मोठ्या संख्येने प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यात आले आहे. त्यात आता धारावीतून चार लाख लोकांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे. त्यामुळे पायाभूत सुविधांवर प्रचंड ताण निर्माण होणार आहे. सरकारच्या या निर्णयाचा आम्ही आधीपासूनच विरोध करत आलो आहोत आणि या पुढेही करत राहू. जनआंदोलनातून यापुढेही आमचा संघर्ष सुरूच राहील, असा निर्धार सामाजिक कार्यकर्ते ॲड. सागर देवरे यांनी व्यक्त केला.

The government plans to give Adani Group 3 acres of land in Mulund for the Dharavi redevelopment project, along with additional land in the area. Local residents are protesting, fearing the strain on Mulund's infrastructure due to the rehabilitation of 4 lakh Dharavi residents. Opponents are organizing public agitations against the plan.

Saamana • 30 Jan • Dharavi

## Plot to impose 'Adani tax' on Mumbaikars

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1, 3 • PG | 1750 • Sqcm | 1039593 • AVE | 910K • Cir | Top Left,Top Right |

Mumbai

# मुंबईकरांवर ‘अदानी कर’ लावण्याचा डाव



## आदित्य ठाकरे यांचा राज्य सरकारवर घणाघात

‘कराचा बोजा मुंबईकरांवर आणि जमिनी अदानीला...’ हा कुठला न्याय, असा सवाल करीत शिवसेना नेते-युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी सरकारवर घणाघात केला.

# मुंबईकरांवर 'अदानी कर' लावण्याचा डाव

## आदित्य ठाकरे यांचा राज्य सरकारवर घणाघात



मुंबई, दि. २९ (प्रतिनिधी) - पालिकेच्या देवनार डंपिंग ग्राऊंडची जागा स्वच्छ करून ती अदानीच्या घशात घालण्यासाठी दोन ते अडीच हजार कोटींचे टेंडर काढण्याचे आदेश राज्य सरकारने पालिकेला दिले आहेत. अदानी समूहावर सवलतींची खैरात आणि येणाऱ्या बजेटमध्ये मुंबईकरांवर 'अदानी कर' लावण्याचा डाव आहे. 'कराचा बोजा मुंबईकरांवर आणि जमिनी अदानी'ला... हा कुठला न्याय!, असा सवाल करीत शिवसेना नेते-युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी आज सरकारवर घणाघात केला.

आदित्य ठाकरे यांनी आज 'मातोश्री' निवासस्थानी पत्रकार परिषद घेऊन सरकारचे 'अदानीप्रेम' आणि नागरी समस्यांबाबतच्या अनास्थेचा समाचार घेतला. धारावीच्या पुनर्विकासाला आमचा विरोध नाही, मात्र या ठिकाणी राहणाऱ्या प्रत्येकाला घर मिळाले पाहिजे. इथे असणाऱ्या व्यावसायिकांसाठी जागा मिळायला पाहिजे, अशी भूमिकाही त्यांनी मांडली. आम्ही सत्तेत आलो असतो तर धारावीसाठी नव्याने टेंडर मागवले असते, असेही ते म्हणाले. भाजप-मिंधे सरकारने कुर्ला मदर डेअरीचा प्लॉट धारावी पुनर्विकासासाठी १० टक्के कमी दराने देण्याचा घाट घातल्याचा आरोपही त्यांनी केला. देवनार डंपिंग ग्राऊंड अदानीच्या घशात घातल्यास मुंबईकरांचा कचरा कुठे टाकणार, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. हे पैसे अदानीच्या घशात घालण्यापेक्षा आर्थिक अडचणीत असणाऱ्या बेस्टला मदत करा, असे आवाहनही त्यांनी केल. आम्ही गोराईच्या डंपिंगचे बायोमायनिंग करून त्यावर उद्यान उभारल्याचेही ते म्हणाले. मात्र हे सरकार हे भूखंड अदानीच्या घशात घालण्याचा डाव आहे. कुर्ला येथील मदर डेअरीचा प्लॉटही अदानीना आंदण देण्याचा डाव असल्याचे ते म्हणाले.

### पाणीपुरवठा विस्कळीत, मुंबई खोदल्याने मनस्ताप

मुंबईच्या अनेक भागांत कमी दाबाने पाणी येते, तर काही ठिकाणी गढूळ तर काही ठिकाणी पाण्याचा प्रेशर कमी असतो. प्रदूषणाची स्थितीदेखील वाईट आहे. सी लिंकवरून १०० मीटरवरील अंतरापुढील काही दिसत नाही. त्यामुळे पालिका, राज्य सरकार आणि राज्याचा प्रदूषण नियंत्रण विभाग करतो तरी काय, असा सवाल आदित्य ठाकरे यांनी केला. संपूर्ण मुंबई खोदून ठेवल्याने वाहतूककोंडी होत असून प्रवासी, वाहनचालकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. या प्रश्नांबाबत मुंबईकरांना उत्तर द्यायला सरकारमधील कुणी पुढे का येत नाही, प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. राज्यातील ईव्हीएम सरकार जनतेसाठी काम करते की अदानीसाठी, असा सवालही त्यांनी केला.

### पालिकेचे विद्यार्थी देणार केंद्रीय बोर्डाची परीक्षा

शिवसेनेच्या पाठपुराव्यामुळे पालिका शाळांमध्ये आयसीएससी, सीबीएससी, आयबी, आयजीसीएससीसारख्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या बोर्डाच्या शाळा सुरू करण्यात आल्या असून पालिका शाळांतील विद्यार्थी आता केंद्रीय बोर्डाच्या परीक्षा देणार असल्याचे पाहून आनंद झाल्याचे ते म्हणाले. मुंबई महानगरपालिका देशातील एकमेव पालिका आहे ज्या ठिकाणी विविध प्रकारच्या बोर्डाच्या अभ्यासक्रमांचे शिक्षण दिले जाते असे गौरवोद्गारही त्यांनी काढले. याबद्दल २०११ ते २०२२ पर्यंतची शिक्षण समिती, एनजीओ, शिक्षणतज्ज्ञ आणि पालिका अधिकाऱ्यांचे आपण आभारी असल्याचेही ते म्हणाले.

**एल्फिन्स्टन पूल फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात पाडण्यात येणार आहे. हा परीक्षांचा कालावधी असल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये यासाठी परीक्षा झाल्यानंतर पूल बंद करावा, अशी मागणी आदित्य ठाकरे यांनी केली.**

Aditya Thackeray criticized the state government's ties with the Adani Group, accusing it of imposing an "Adani tax" on Mumbai residents. He questioned the handling of Mumbai's infrastructure, water supply, pollution, and traffic issues due to ongoing redevelopment projects. Thackeray also raised concerns over the Deonar Dumping Ground and criticized the government's approach to public welfare.

Loksatta • 30 Jan • Dharavi

## Deonar garbage plot also to Dharavikars

| 1, 10 • PG | 258 • Sqcm | 1011727 • AVE | 784.32K • Cir | Top Right |
| --- | --- | --- | --- | --- |

Mumbai

# देवनार कचराभूमीचा भूखंडही धारावीकरांना

## जमिनीसाठी पालिका आयुक्तांना विनंती

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई** : धारावी पुर्नविकास प्रकल्पासाठी मुलुंड कचराभूमीच्या जागेनंतर आता देवनार कचराभूमीची जमीनही त्या प्रकल्पासाठी देण्याचा घाट घातला जात आहे. विशेष म्हणजे देवनारच्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी मुंबई महापालिकेवर टाकण्यात आली असून महसूल व वन विभाग विभागाने पालिका आयुक्तांना पत्र लिहून जमीन रिकामी करण्याची विनंती केली आहे.

धारावी पुनर्विकास प्रकल्पातील अपात्र रहिवाशांना सामावून घेण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने मुंबईतील विविध ठिकाणच्या जागांची मागणी केली आहे. महापालिकेने मुलुंडमधील ५६ एकर जागा देण्याची तयारी दर्शवली असताना मुलुंड कचराभूमीची *(पान १० वर)*



### प्रकल्पाची वैशिष्ट्ये

- एकूण जमीन १२० हेक्टर
- १९२७ पासून क्षेपणभूमी म्हणून वापर
- कचऱ्याच्या डोंगरांची उंची ४० मीटर
- रोज ६०० ते ८०० मेट्रीक टन कचरा

# देवनार कचराभूमीचा भूखंडही धारावीकरांना

*(पान १ वरून)*

४१.३६ एकर जमिनीची भर घातली आहे. याबरोबरच देवनारचा १२४.३ एकर भूखंड देण्याचा निर्णय तीन महिन्यांपूर्वी झाला आहे. मात्र या क्षेपणभूमीवर गेल्या शंभर वर्षांपासून जुना कचरा साठला आहे. या कचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करून जमीन रिकामी करावी लागणार आहे. सध्या देवनार कचराभूमीवर पालिकेने ६०० मेट्रीक टन कचऱ्यापासून वीज निर्मिती करण्याचा प्रकल्प हाती घेतला आहे. हा प्रकल्प ऑक्टोबर महिन्यापासून सुरू होण्याची शक्यता आहे.

मुलुंड कचराभूमीवरील कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्याचा प्रकल्प पालिकेने २०१८ मध्ये हाती घेतला होता. हा प्रकल्प सहा वर्षांत केवळ ५० टक्के पूर्ण होऊ शकला आहे. देवनारची क्षमता त्याच्या कित्येकपट जास्त आहे. तेथील कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी निविदा प्रक्रिया राबवून प्रत्यक्षात विल्हेवाटीचा प्रकल्प सुरू होण्यास सहा सात महिने लागू शकतात. त्यानंतर कचऱ्याचे डोंगर रिकामे होण्यास सात आठ वर्षे लागतील. त्यामुळे धारावी प्रकल्पासाठी जमीन देण्याचा हेतू सफल होणार का याबाबत शंका व्यक्त केली जात आहे.

**पालिकेला २५०० कोटींचा खर्च**

अनेक वर्षांपासून साचलेले कचऱ्याचे डोंगर हटवून जमीन रिकामी करण्याचे आदेश राज्य सरकारने मुंबई महापालिकेला दिले आहेत. देवनार क्षेपणभूमीवर तब्बल २० लाख मेट्रीक टन जुना कचरा जमा आहे. बायोमायनिंग पद्धतीने प्रक्रिया करून विल्हेवाट लावायचे झाल्यास १२०० रुपये प्रति टन खर्च येईल. परिणामी महापालिकेला कचरा हटवण्यासाठी २५०० कोटी खर्ची घालावे लागणार आहेत. तसेच कचरा हटवण्यासाठी सहा ते सात वर्षे लागण्याची शक्यता असल्याने महापालिकेसमोर एक नवा पेच निर्माण होणार आहे.

various municipal bodies in mumbai are discussing the allocation of land for both the deonar garbage plot and the dharavi redevelopment project, with specific mentions of requests to vacate certain lands by different departments.

Loksatta • 30 Jan • Dharavi

## All the land in Mumbai from the government to 'Adani

| 4 • PG | 200 • Sqcm | 785581 • AVE | 784.32K • Cir | Middle Left |
|---|---|---|---|---|

Mumbai

# सरकारकडून मुंबईतील सर्वच जमिनी 'अदानी'ला

## देवनारच्या जागेवरून आदित्य ठाकरे यांची टीका

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** भाजप सरकार सत्तेवर आल्यानंतर अदानी कंपनी मुंबईला गिळायला निघाली आहे. मुंबईकर कर भरत असतानाही सर्वाधिक फायदा अदानीला मिळत आहे. भाजप सरकार मुंबईतील सगळ्या जमिनी अदानीच्या घशात घालत आहेत.



पालिकेचा विरोध झुगारून हा भूखंड तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सरकारने अदानीला दिला होता. पण तीच जागा राज्य सरकारने महापालिकेला परत घेण्याचे आदेश दिले आहेत. ती जागा स्वच्छ करून अदानीला देण्यात येणार आहे. जागेच्या स्वच्छतेसाठी दोन–अडीच हजार कोटी लागले तरी ते वापरा आणि ती जागा अदानीला द्या, असे आदेश देण्यात आले.

- **आदित्य ठाकरे**, आमदार, शिवसेना (ठाकरे)

कोणतेही नवीन कंत्राट अदानीला दिले जात आहे. कराचा ओझा मुंबईकरांवर आणि जमीन अदानीला हा कुठचा न्याय, अशी टीका शिवसेना (ठाकरे) नेते आदित्य ठाकरे यांनी बुधवारी येथे केली.

देवनार येथील कचरा भूमीची (डंम्पिग ग्राऊंड) जागा अदानीला दिली जाणार आहे. ती जागा स्वच्छ करून देण्यासाठी दोन-अडीच हजार रूपयांची निविदा काढली जाणार आहे, या मुद्द्यावरून ठाकरे यांनी बुधवारी पत्रकार परिषद घेत राज्य सरकारवर हल्ला चढविला.

**सरकारचे महापालिकेला आदेश**

अदानी समूह म्हणजेच भाजप सरकार आहे. धारावीच्या विकासासाठी बाजारभावापेक्षा दहापट कमी दराने कुर्ला येथील मदर डेअरीचा भूखंड अदानीला दिला जाणार आहे. त्याशिवाय काही महिन्यांपूर्वी देवनारचे डंपिंग ग्राऊंड राज्य सरकारने धारावी पुनर्विकासासाठी दिले होते. कचऱ्याच्या ढिगाऱ्यावर धारावीतील लोकांना नेऊन ठेवणार होते, पण शहराचा कचरा टाकायचा कुठे हा प्रश्न पालिकेला पडल्यानंतर त्यांनी विरोध केला होता, असे ठाकरे म्हणाले.

the article discusses aditya thackeray's criticism of the bjp government for favoring the adani group in land deals, including the mother dairy plot and deonar dumping ground, which are crucial for dharavi's redevelopment. he argues that such decisions negatively impact mumbai's development and tax revenue.

Pudhari • 30 Jan • Dharavi

## Two and a half thousand crores to the municipality for Adani

| 1, 2 • PG | 280 • Sqcm | 252267 • AVE | 347.1K • Cir | Bottom Center,Bottom Left |
|---|---|---|---|---|

Mumbai

# अदानीसाठी पालिकेला अडीच हजार कोटींचा भुर्दंड?

## देवनार डंपिंग ग्राऊंडवरील कचरा साफ करून देण्याचे राज्य सरकारचे आदेश

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

अदानी समूहातर्फे देवनार क्षेपणभूमी( डंपिंग ग्राऊंड)च्या १२४ एकर भूखंडावर धारावीतील अपात्र रहिवाशांचे स्थलांतर करण्यात येणार असले तरी या भूखंडावरील कचरा साफ करण्याची जबाबदारी अदानी समूहाने झटकली आहे.

या भूखंडावरील कचरा साफ करून आम्हाला द्या, अशी उलट मागणी अदानी समूहाने केल्यानंतर तीन महिन्यांपूर्वी विना तक्रार हा भूखंड महापालिकेकडून आहे त्या स्थितीत स्वीकारणा-या राज्य सरकारने घुमजाव करीत आता महापालिकेनेच या भूखंडावरील कचरा साफ करावा, असा फतवा काढला आहे. अदानी समूहाला कचरा-मुक्त भूखंड देण्यासाठी मुंबई महापालिकेला किमान अडीच हजार कोटींचा भुर्दंड सोसावा लागणार असल्याचे विश्वसनीय /...२

### मुंबईकरांवर 'अदानी' कर लादणार : आदित्य ठाकरे

• पान २



• धारावी पुनर्वसन प्रकल्पात चौदा ते पंधरा लाख धारावीकर अपात्र ठरवले जाणार आहेत असा आतापर्यंतचा अंदाज आहे. या अपात्र ठरणाऱ्या धारावीकरांचे पुनर्वसन नेमके कुठे होणार ? वडाळा, मुलुंड, कुर्ला की थेट दहिसर यापैकी एका ठिकाणी की या सर्वच ठिकाणी हे पुनर्वसन केले जाणार? अदानी आणि राज्य सरकारने आपले पत्ते अद्याप उघड केलेले नसताना आता अपात्र धारावीकरांना देवनारमध्ये डम्पिंग यार्डच्या भूखंडावर देखील वसवले जाण्याची शक्यता समोर आली. देवनारमधल्या झोपडपट्ट्यांचेच भवितव्य अधांतरी असताना तिथले डम्पिंग यार्ड मात्र धारावीकरांसाठी म्हणून अदानी समूहास आता बहाल केले जाईल.

# अदानीसाठी पालिकेला अडीच हजार कोटींचा भुर्दंड

वृत्त आहे.राज्य सरकारच्या या आदेशामुळे मुंबई महापालिकेपुढे एक नवेच संकट उभे ठाकले असून अदानी समुहाच्या प्रकल्पासाठी किमान अडीच हजार कोटींचा भूर्दंड मुंबई मनपाला सोसावा लागेल अशी चिन्हे आहेत. विविध महत्वांकाक्षी प्रकल्प राबवित असलेल्या मुंबई महापालिकेपुढे यामुळे निधी उपलबध्दतेचे नवे संकटच निर्माण झाले आहे. अदानी समुहाच्या प्रकल्पासाठी हा भुर्दंड महापालिकेने का झेलायचा, असा प्रश्नही महापालिकेत विचारला जाऊ लागला आहे.

अदानी समुहातर्फे विकसित केल्या जाणा-या धारावी पुनर्विकास प्रकल्पातील अपात्र रहिवाशांना मुंबई महानगर पालिकेच्या सीमेवर असलेल्या देवनार क्षेपणभूमी( डंपिंग ग्राऊंड)वर स्थलांतरित करण्यात येणार आहे. स्थानिक रहिवाशांचा याला विरोध असला तरी आपला निर्णय रेट्रून नेण्यासाठी अदानी समुहाने पूर्ण ताकद लावली आहे. अदानी समुहाने देवनारमधील भूखंडावरील कचरा साफ करून मागितल्याने राज्य सरकारने ही खर्चिक जबाबदारी मुंबई महापालिकेवर ढकलली आहे. यासाठी देवनार क्षेपणभूमीतील कचरा तात्काळ साफ करण्याचे आदेश राज्य सरकारने मुंबई महापालिकेला दिले आहेत.

धारावी पुनर्विकास हा राज्य सरकारच्या मुंबईतील सर्वात महत्त्वाकांक्षी प्रकल्पांपैकी एक प्रकल्प आहे. या प्रकल्पाला विकसित करण्याचे काम अदानी समुहाला देण्यात आले आहे. या पुनर्विकासाच्या बदल्यात अदानी समुहावर अनेक सवलतींचा अक्षरशः पाऊस पाडण्यात आला आहे.

देवनार येथील ३११ एकर पैकी १२४ एकर जमीन अदानी समुहाच्या धारावी पुनर्विकास प्रायव्हेट लिमिटेडला देण्याचा निर्णय गेल्यावर्षी ऑक्टोबर महिन्यात राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. त्यानुसार तीनच महिन्यांपूर्वी मुंबई महापालिकेने १२४ एकराचा भुखंड राज्य सरकारला सोपविला. अदानी समुहाला ही जमीन धारावी पुवर्सन प्रकल्पासाठी हस्तांतरित केली जाणार असताना अदानी समुहाने गेल्यावर्षी २६ डिसेंबर रोजी एक पत्र राज्य शासनाला पाठवून या जमिनीवरील कचरा साफ केल्यानंतरच हा भूखंड आपल्याला हस्तांतरित करण्यात यावा, अशी मागणी केली होती. त्यामुळे तीन महिन्यांपूर्वी 'आहे-त्या-स्थितीत' देवनारचा १२४ एकराचा भूखंड स्वीकारणा-या सरकारने अचानक घुमजाव करीत या भूखंडावरील कचरा शास्त्रीयरीत्या नष्ट करून मगच हा भूखंड देण्याचे आदेश महापालिकेला दिले आहेत. २४ जानेवारी रोजी राज्य सरकारने मुंबई महापालिका आयुक्तांना यासंदर्भात एक पत्र पाठविले असून या १२४ एकर भुखंडावरील कचरा साफ करून देण्याचे निर्देश मुंबई मनपाला दिले आहेत. स्वच्छ भारत मिशन २०१६ च्या नियमांनुसार कच-यावर आहे त्या ठिकाणीच शास्त्रशुध्दरीत्या प्रक्रिया करून कचरामुक्त भूखंड राज्य सरकारला देणे ही महापालिकेचीच जबाबदारी आहे, असे राज्य सरकारने आपल्या पत्रात म्हटले आहे.

the article discusses the adani group’s role in cleaning a 5-acre plot at the deonar dumping ground, which could lead to the displacement of some dharavi residents requiring rehabilitation elsewhere or within the dumping yard plot itself. it also mentions potential financial implications for the mumbai municipal corporation and the government's stance on clearing waste from this area.

Pudhari • 30 Jan • Dharavi

## Adani tax will be imposed on Mumbaikars: Aditya Thackeray

| 2 • PG | 215 • Sqcm | 193795 • AVE | 347.1K • Cir | Middle Center |
|---|---|---|---|---|

Mumbai

# मुंबईकरांवर 'अदानी' कर लादणार: आदित्य ठाकरे

## केंद्र- राज्य सरकारवर खोचक टीका; देवनारची जागा स्वच्छ करून अदानीला देणार

**मुंबई: पुढारी वृत्तसेवा**

भाजप सरकार सत्तेवर आल्यानंतर अदानी कंपनी मुंबईला गिळायला निघाली आहे. या कंपनीला भाजप सरकार मोठ्या प्रमाणात सवलती देत आहे. मुंबईकर कर भरत असतानाही सर्वाधिक फायदा हा अदानीला मिळत आहे. त्यामुळे उद्याच्या केंद्र व राज्य सरकारच्या अर्थसंकल्पात मुंबईकरांवर आणखी एक अदानी कर लादला जाणार आहे, अशी खोचक टीका युवासेनाप्रमुख, आमदार आदित्य ठाकरे यांनी केली.

मुंबई आणि महाराष्ट्राचे हाल केले जात आहेत. मुंबईला मिळणारे कमी आणि अशुद्ध पाणी पुरवठा, मुंबईचे खराब हवामान, वाढते प्रदूषण, जागोजागी सुरु असलेले खोदकाम यामुळे मुंबईकरांचे हाल सुरु आहेत. मुंबईकरांच्या या प्रश्नांना उत्तरे द्यायला कोणीच नसल्याचे सांगतानाच देवनार येथील डम्पिंग ग्राऊंडची जागा अदानीला दिली जाणार आहे. ती जागा स्वच्छ करून देण्यासाठी दोन-अडीच हजार कोटी रूपयांचे टेंडर काढले जाणार आहे, त्यावरून आदित्य ठाकरे यांनी बुधवारी पत्रकार परिषद घेत राज्य सरकारवर हल्ला चढवला.

राज्यात अदानी समूहाचे सरकार आले आहे. अदानी समूह म्हणजेच भाजप सरकार आहे. हे सरकार आल्यानंतर भाजप आणि मिंधे गटाचे आमदार खोटे बोलत असल्याचा आरोप आदित्य ठाकरे यांनी केला. धारावीच्या विकासाकरिता बाजारभावापेक्षा दहापट कमीदराने कुर्ला येथील मदर डेअरी अदानीला दिला जाणार असल्याची बातमी आली आहे. त्याशिवाय काही महिन्यांपूर्वी देवनारचे डंपिंग ग्राऊंड राज्य सरकारने धारावी पुनर्विकासासाठी दिले होते. कचऱ्याच्या ढिगाऱ्यावर धारावीतील लोकांना नेऊन ठेवणार होते. पण शहराचा कचरा टाकायचा कुठे हा प्रश्न पालिकेला पडल्यानंतर त्यांनी विरोध केला. परंतु, पालिकेचा विरोध झुगारून




घटनाबाह्य मुख्यमंत्र्यांनी तो प्लॉट त्यांचे मालक अदानीला दिला. पण आज तीच जागा राज्य सरकारने महापालिकेला परत घेण्याचे आदेश दिले आहेत. ती जागा स्वच्छ करून अदानीला देण्यात येणार आहे. जागेच्या स्वच्छतेसाठी दोन-अडीच हजार कोटी लागले तरी ते वापरा आणि ती जागा अदानीला द्या, असे आदेश देण्यात आल्याचा गौप्यस्फोट आदित्य ठाकरे यांनी केला.

भाजप सरकार मुंबईतील सगळ्या जमिनी अदानीच्या घशात घालत आहे. कोणतेही नवीन टेंडर अदानीला दिले जात आहे. सगळे काही अदानीला द्यायचे असेल तर हा अदानी कर नक्की काय आहे, कराचा बोझा मुंबईकरांवर आणि जमीन अदानीला हा कुठचा न्याय भाजपने आणला आहे, असा सवालही आदित्य ठाकरे यांनी केला. सरकारच्या आदेशाने जर हे असेच सुरू राहिले आणि या विरोधात मुंबईकर रस्त्यावर उतरले तर त्याला जबाबादार फक्त भाजप व त्यांचे खरे मालक अदानी असतील, असा इशारा देतानाच ईव्हीएममध्ये घोटाळे करून जे सरकार आणले ते जनतेसाठी आणले की अदानीसाठी, अशा शब्दात आदित्य ठाकरे यांनी महायुती सरकारला फटकारले.

Aditya Thackeray accused the BJP government of favoring the Adani Group, alleging it would impose an "Adani tax" on Mumbai in the upcoming budget. He criticized the government's handling of Mumbai's infrastructure, pollution, and garbage disposal, claiming it is unfairly benefiting Adani, with little regard for Mumbai's residents.

Pudhari • 30 Jan • Dharavi

## Shiv Sena's agitation today to protest against rehabilitation

| 8 • PG | 60 • Sqcm | 53828 • AVE | 347.1K • Cir | Middle Left |
|---|---|---|---|---|

Mumbai

# पुनर्वसना विरोधासाठी आज शिवसेनेचे आंदोलन

**मुलुंड : वार्ताहर**

धारावीमधील रहिवाशांचे पुनर्वसन मुलुंडमध्ये करण्याच्या निर्णयाचा निषेध करण्यासाठी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने गुरूवार, दि. ३० जानेवारी रोजी सायंकाळी ५ वाजता आंदोलन करण्यात येणार आहे.

या आंदोलनाचे नेतृत्त्व ईशान्य मुंबईचे खासदार संजय पाटील, आमदार सुनिल राऊत, मा. आमदार, विभागप्रमुख रमेश कोरगावकर, विभाग संघटक मा. नगर सेविका राजराजेश्वरी रेडकर इत्यादी मान्यवर करणार आहेत. या आंदोलनात नागरिकांनी बहुसंख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करणारे व्हाट्सअप मेसेज मुलुंडमध्ये फिरत आहेत.

दरम्यान, धारावीतील रहिवाशांचे पुनर्वसन केल्यास मुलुंडकरांच्या पायाभूत सुविधांवर परिणाम होणार असल्याचा आरोप शिवसेनेने केला आहे.

the article details the shiv sena's agitation planned to protest against the rehabilitation of dharavi residents, led by key party members including sanjay patil and sunil raut. it mentions that citizens are being urged to participate through whatsapp messages in mulund.

Aaple Mahanagar • 30 Jan • Dharavi

## Adani tax will be imposed on Mumbaikars

| 1, 2 • PG | 300 • Sqcm | 67573 • AVE | 375K • Cir | Middle Center,Middle Left |
|---|---|---|---|---|

Mumbai

# मुंबईकरांवर अदानी कर लादणार !

## आदित्य ठाकरे यांची भाजप सरकारवर टीका

प्रतिनिधी । आपलं महानगर वृत्तसेवा



**मुंबई :** भाजप सरकार सत्तेवर आल्यापासून अदानी कंपनी मुंबईला गिळायला निघाली आहे. या कंपनीला भाजप सरकार मोठ्या प्रमाणात सवलती देत आहे. मुंबईकर कर भरत असतानाही सर्वाधिक फायदा हा अदानीला मिळत आहे. त्यामुळे उद्याच्या केंद्र आणि राज्य सरकारच्या अर्थसंकल्पात मुंबईकरांवर आणखी एक अदानी कर लादला जाणार असल्याची टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांनी बुधवारी येथे पत्रकार परिषदेत बोलताना केली.

मुंबई आणि महाराष्ट्राचे हाल केले जात आहेत. मुंबईला मिळणारा कमी आणि अशुद्ध पाणी पुरवठा, मुंबईचे खराब हवामान, वाढते प्रदूषण, जागोजागी सुरू असलेले खोदकाम यामुळे मुंबईकरांचे हाल सुरू आहेत. मुंबईकरांच्या या प्रश्नांना उत्तरे द्यायला कोणीच नसल्याचे सांगतानाच देवनार येथील डंम्पिंग ग्राऊंडची जागा अदानीला दिली जाणार आहे. ती जागा स्वच्छ करून देण्यासाठी दोन-अडीच हजार कोटी रुपयांचे टेंडर काढले जाणार आहे, असा आरोप आदित्य ठाकरे यांनी केला. राज्यात अदानी समूहाचे सरकार आले आहे. अदानी समूह म्हणजेच भाजप सरकार आहे. धारावीच्या विकासासाठी बाजारभावापेक्षा दहापट कमी दराने कुर्ला येथील मदर डेअरी अदानीला दिली जाणार असल्याची बातमी आली आहे. त्याशिवाय काही महिन्यांपूर्वी देवनारचे डम्पिंग ग्राऊंड राज्य सरकारने धारावी पुनर्विकासासाठी दिले होते.

पान २

# मुंबईकरांवर अदानी कर लादणार!

कचऱ्याच्या ढिगाऱ्यावर धारावीतील लोकांना नेऊन ठेवणार होते, पण शहराचा कचरा टाकायचा कुठे, असा प्रश्न पालिकेला पडल्यानंतर त्यांनी विरोध केला, परंतु महापालिकेचा विरोध झुगारून घटनाबाह्य मुख्यमंत्र्यांनी तो प्लॉट त्यांचे मालक अदानीला दिला, पण आज तीच जागा राज्य सरकारने महापालिकेला परत घेण्याचे आदेश दिले आहेत. ती जागा स्वच्छ करून अदानीला देण्यात येणार आहे. जागेच्या स्वच्छतेसाठी दोन-अडीच हजार कोटी लागले तरी ते वापरा आणि ती जागा अदानीला द्या, असे आदेश देण्यात आल्याचा दावा आदित्य ठाकरे यांनी केला.

भाजप सरकार मुंबईतील सगळ्या जमिनी अदानीच्या घशात घालत आहेत. कोणतेही नवीन टेंडर अदानीला दिले जात आहे. सगळे काही अदानीला द्यायचे असेल तर हा अदानी कर नक्की काय आहे, कराचा बोझा मुंबईकरांवर आणि जमीन अदानीला हा कुठला न्याय भाजपने आणला आहे, असा सवालही आदित्य ठाकरे यांनी केला. सरकारच्या आदेशाने जर हे असेच सुरू राहिले आणि याविरोधात मुंबईकर रस्त्यावर उतरले तर त्याला जबाबदार फक्त भाजप आणि त्यांचे खरे मालक अदानी असतील, असा इशारा देतानाच ईव्हीएममध्ये घोटाळे करून जे सरकार आणले ते जनतेसाठी आणले की अदानीसाठी, अशा शब्दांत आदित्य ठाकरे यांनी महायुती सरकारला फटकारले.

the article discusses aditya thackeray's criticism of the bjp government for favoring the adani group over mumbai residents. it mentions issues like water supply, pollution, and redevelopment projects in dharavi where adani is receiving significant benefits at a perceived cost to the city.

# Channel Overview

## Business Channel

No Coverage in this segment

## English Channel

No Coverage in this segment

## Hindi Channel

| Total Clip | Top Channel |
|---|---|
| **2** | **ABP News (1)** |

| | | |
|---|---|---|
| 1. | ABP News | 1 |
| 2. | India Tv | 1 |

# Channel Overview

## Regional & Others Channel

| Total Clip | Top Channel |
|---|---|
| **25** | **Saam (8)** |

| | Channel | Clips |
|---|---|---|
| 1. | Saam | 8 |
| 2. | Jai Maharashtra | 4 |
| 3. | TV9 Marathi | 3 |
| 4. | News18 Lokmat | 3 |
| 5. | ABP Majha | 2 |
| 6. | Zee 24 Taas | 2 |
| 7. | Lokshahi Marathi | 2 |
| 8. | Pudhari News | 1 |

**Jai Maharashtra**
**Dharavi**




There is a huge opposition to the rehabilitation of Dharavi residents in Mulund, with locals protesting by putting up signs d...

News • Marathi • 12:23 PM 30 Jan, 2025

**ABP News**
**Dharavi**




Arvind Kejriwal said that the Ganga of government treasure is flowing towards the common man in Delhi. It is flowing towards ...

News • Hindi • 11:39 AM 30 Jan, 2025

**ABP Majha**
**Dharavi**




Difficulties in allocating Deonar site for Dharavi project, about 2 million metric tonnes of old waste is currently accumulat...

News • Marathi • 11:12 AM 30 Jan, 2025

**TV9 Marathi**
**Dharavi**




Opposition to giving land in Mulund for Dharavi project

News Top 9 • Marathi • 11:08 AM 30 Jan, 2025

**News18 Lokmat**
**Dharavi**




Deonar landfill land will be given to Dharavi project

Gavakadchya 50 Batmya • Marathi • 10:44 AM 30 Jan, 2025

**TV9 Marathi**
**Dharavi**




Opposition to giving land in Mulund for Dharavi project

News • Marathi • 10:08 AM 30 Jan, 2025

**Saam**
**Dharavi**




Aditya Thackeray's serious allegations against the state government, an attempt to put all the land in the hands of Adani, Is...

Top 50 • Marathi • 09:34 AM 30 Jan, 2025

**ABP Majha**
**Dharavi**




Difficulties in allocating Deonar site for Dharavi project, about 2 million metric tonnes of old waste is currently accumulat...

News • Marathi • 09:10 AM 30 Jan, 2025

**TV9 Marathi**
**Dharavi**




Opposition to giving land in Mulund for Dharavi project

News Top 9 • Marathi • 09:07 AM 30 Jan, 2025

**News18 Lokmat**
**Dharavi**




While earlier it was decided to give the Mulund landfill site for the Dharavi redevelopment project, now the Deonar landfill ...

Gavakadchya 50 Batmya • Marathi • 08:32 AM 30 Jan, 2025

**Saam**
**Dharavi**




Aditya Thackeray has strongly criticized the state government as well as the Adani Group. Speaking at a press conference, Adi...

Top 50 • Marathi • 07:40 AM 30 Jan, 2025

**News18 Lokmat**
**Dharavi**




While earlier it was decided to give the Mulund landfill site for the Dharavi redevelopment project, now the Deonar landfill ...

Gavakadchya 50 Batmya • Marathi • 07:29 AM 30 Jan, 2025

**Zee 24 Taas**
**Dharavi**




Opposition to Dharavi rehabilitation in Mulund

24 Tass Superfast • Marathi • 07:09 AM 30 Jan, 2025

**Saam**
**Dharavi**




Aditya Thackeray's serious allegations against the state government, an attempt to put all the land in the hands of Adani, Is...

News • Marathi • 06:50 AM 30 Jan, 2025

**Saam**
**Dharavi**




Aditya Thackeray's serious allegations against the state government, an attempt to put all the land in the hands of Adani, Is...

News • Marathi • 06:30 AM 30 Jan, 2025

**Zee 24 Taas**
**Dharavi**




Opposition to Dharavi rehabilitation in Mulund

Maharashtra Superfast • Marathi • 06:27 AM 30 Jan, 2025

**Saam**
**Dharavi**




Aditya Thackeray's serious allegations against the state government, an attempt to put all the land in the hands of Adani, Is...

News • Marathi • 06:12 AM 30 Jan, 2025

**India Tv**
**Dharavi**




Statement of Shiv Sena UBT MLA Aditya Thackeray, Looting is happening in the name of Dharavi project- Aditya

Super 100 • Hindi • 08:52 PM 29 Jan, 2025

**Saam**
**Dharavi**




All projects in Mumbai to Adani: Thackeray

News • Marathi • 07:33 PM 29 Jan, 2025

**Saam**
**Dharavi**




All projects in Mumbai to Adani: Thackeray

News • Marathi • 07:14 PM 29 Jan, 2025

**Saam**
**Dharavi**




Aditya Thackeray's serious allegations against the state government, an attempt to put all the land in the hands of Adani, Is...

Breaking News • Marathi • 05:37 PM 29 Jan, 2025

**Jai Maharashtra**
**Dharavi**




In the context of redevelopment of Dharavi, the government has given 58.5 acres of land in Mulund to the residents of Mulund ...

News • Marathi • 04:44 PM 29 Jan, 2025

**Lokshahi Marathi**
**Dharavi**




Live: Aditya Thackeray Targets And Made Serious Allegations Against The State Government over Dharavi Redevelopment Project a...

Live • Marathi • 04:20 PM 29 Jan, 2025

**Pudhari News**
**Dharavi**




Live: Aditya Thackeray Targets And Made Serious Allegations Against The State Government over Dharavi Redevelopment Project a...

Live • Marathi • 04:19 PM 29 Jan, 2025

**Jai Maharashtra**
**Dharavi**




Live: Aditya Thackeray Targets And Made Serious Allegations Against The State Government over Dharavi Redevelopment Project a...

Live • Marathi • 04:16 PM 29 Jan, 2025

**Jai Maharashtra**
**Dharavi**




In the context of redevelopment of Dharavi, the government has given 58.5 acres of land in Mulund to the residents of Mulund ...

Mahafast 60 • Marathi • 03:35 PM 29 Jan, 2025

**Lokshahi Marathi**
**Dharavi**




Not Mulund, but new Dharavi, banners were displayed, Rehabilitation of Dharavi victims at Mithagara site, police took action ...

Breaking News • Marathi • 03:25 PM 29 Jan, 2025

## Online Coverage

| No | Portal Name | Headline (Incorporated with URL) | Reach |
|---|---|---|---|
| 1. | Msn | मुलुंडमधील नवीन धारावीसंदर्भातील फलक हटविले | 733.9M |
| 2. | Msn | Aaditya Thackeray : “अदाणी समूह मुंबई गिळायला निघाला आहे”, आदित्य ठाकरेंचा घाणाघ... | 733.9M |
| 3. | Hindustan Times | Deonar waste will take 14 years to clear, cost ₹ 2,500 crore: BMC | 124.6M |
| 4. | The Times of India | May take over 10 yrs to spruce up Deonar dump for Dharavi redevpt, say officials | 64.4M |
| 5. | Lokmat | नवीन धारावी! मुलुंडमध्ये ठिकठिकाणी लागले नामांतरणाचे बॅनर, प्रकरण काय? | 42.3M |
| 6. | The Hindu | Mumbaikars paying ‘Adani tax": Aaditya Thackeray | 35.9M |
| 7. | Loksatta - Marathi Newspaper | सरकारकडून मुंबईतील सर्वच जमिनी ‘अदानी"ला; देवनारच्या जागेवरून आदित्य ठाकरे यांच... | 33.4M |
| 8. | Loksatta - Marathi Newspaper | देवनार कचराभूमीची जमीन धारावी प्रकल्पाला; जमीन देण्याची महसूल विभागाची पालिका आय... | 33.4M |
| 9. | Loksatta - Marathi Newspaper | मुलुंडमधील नवीन धारावीसंदर्भातील फलक हटविले | 33.4M |
| 10. | Loksatta - Marathi Newspaper | Aaditya Thackeray : “अदाणी समूह मुंबई गिळायला निघाला आहे”, आदित्य ठाकरेंचा घाणाघ... | 33.4M |
| 11. | ThePrint | Mumbai being looted under Dharavi redevelopment project: Aaditya | 11.3M |
| 12. | Latestly | India News \| Mumbai Being Looted Under Dharavi Redevelopment Project: Aadity a | 7.8M |
| 13. | Mid-Day | Mumbai being looted under Dharavi redevelopment project: Aaditya Thackeray | 7.5M |
| 14. | ABP Live | Mumbai News : मुंबई महापालिकेचा अर्थसंकल्प 3 फेब्रुवारीला सादर होणार; मुंबईकरांव... | 7.1M |
| 15. | Saamana | मुंबईकरांवर ‘अदानी कर" लावण्याचा डाव, आदित्य ठाकरे यांचा राज्य सरकारवर घणाघात | 1.2M |
| 16. | Saamana | मुलुंडकरांची 114 एकर जागा अदानी घेणार, रहिवाशांचा जनआंदोलनातून संघर्षाचा इशारा | 1.2M |
| 17. | Devdiscourse | Controversy Surrounds Dharavi Redevelopment: Aaditya Thackeray Raises Conc erns | 1.2M |
| 18. | Saamana | कराचा बोझा मुंबईकरांवर आणि जमिनी अदानीला, हा भाजपचा कुठला न्याय, आदित्य ठाकरे या... | 1.2M |
| 19. | Press Trust of India | Mumbai being looted under Dharavi redevelopment project: Aaditya | 200.1K |
| 20. | News Drum | Mumbai being looted under Dharavi redevelopment project: Aaditya | 158.4K |
| 21. | HT Syndication | Deonar waste will take 14 years to clear, cost rRs.r2,500 crore: BMC | 119.8K |
| 22. | HT Syndication | Deonar waste will take 14 years to clear, cost Rs.2,500 crore, says BMC | 119.8K |
| 23. | Pudhari | Dharavi \| अदानीसाठी पालिकेला अडीच हजार कोटींचा भुर्दंड ? | N/A |
| 24. | Prabhu Kvn | Mumbaikars paying ‘Adani tax": Aaditya Thackeray | N/A |

| | | | |
|---|---|---|---|
| 25. | Today News 24 | Mumbaikars paying ‘Adani tax": Aaditya Thackeray | N/A |
| 26. | Newsr | Dharavi redevelopment: Mumbai being looted under project, says Aaditya | N/A |
| 27. | origin.mid-day.com | Mumbai being looted under Dharavi redevelopment project: Aaditya Thackeray | N/A |
| 28. | BharatKi Baat | Aaditya claims Mumbai is being looted through the Dharavi redevelopment project . | N/A |